# जिवंत अवयवदान प्रक्रिया सुलभ करणार

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती

## नाशिकमध्ये नवे प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्र

**मुंबई (प्रतिनिधी)–** अवयव प्रत्यारोपणासाठी आवश्यक रुग्णालय नोंदणी प्रक्रिया सुलभ आणि तत्काळ करतानाच विभागीय प्राधिकरण समित्यांकडून जिवंत अवयवदान परवानगी प्रक्रियेला सुलभ केले जाईल, अशी माहिती अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी गुरुवारी येथे दिली. राज्यात नशिकसह अमरावती, कोल्हापूर आणि सोलापूर येथे नवे प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समन्वय केंद्र स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

आरोग्य भवन येथे काल अवयव प्रत्यारोपणाविषयी बैठक पार पडली. या बैठकीत त्यांनी अवयव प्रत्यारोपण केंद्राबाबत माहिती दिली. अवयवदानासाठी जनजागृती, सन्मान आणि सामाजिक सहभाग असल्याने राज्यभर जनजागृती मोहीम राबवून जनतेत अवयवदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार १ मे या महाराष्ट्र दिनी, जिल्हास्तरावर अवयवदाते आणि त्यांच्या कुटुंबीयांचा पालकमंत्री तसेच जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. याशिवाय अवयव प्रत्यारोपण करणाऱ्या डॉक्टर आणि समन्वयकांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या जातील. तसेच फेलोशिप इन क्रिटीकल मेडीसीनफ हा पदव्युत्तर अभ्यासक्रम वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत तात्काळ सुरू केला जात असल्याची माहिती आबिटकर यांनी यावेळी दिली. शासकीय रुग्णालयांमध्ये मानवी अवयव पुनर्प्राप्ती केंद्रांची निर्मिती आणि त्या ठिकाणी समन्वयकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे प्रकाश आबिटकर यावेळी म्हणाले. या बैठकीला भाजपच्या आमदार देवयानी फरांदे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ.निपुण विनायक, आरोग्य सेवा संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, वैद्यकीय शिक्षण सहसंचालक डॉ.पल्लवी सापळे, वैद्यकीय अधिकारी मानवी अवयव प्रत्यारोपण तसेच विधी आणि न्याय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**कामगार विमा रुग्णालये होणार अत्याधुनिक रेशन दुकानदार, पतसंस्था कर्मचारी आणि शिक्षकांनाही लाभ होणार**

दरम्यान, राज्यातील कामगार विमा योजनेंतर्गत येणाऱ्या सर्व रुग्णालयातील पायाभूत सुविधा आणि यंत्रसामग्री आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आबिटकर यांनी अन्य एका बैठकीत दिले. राज्यातील रेशन दुकानदार, पतसंस्था कर्मचारी आणि शिक्षक यांनाही कामगार विमा योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच रुग्णालयातील रुग्णसंख्या वाढवण्यासाठी आरोग्य अधिकाऱ्यांनी शिबिरे आयोजित करावीत आणि सुविधा वाढवण्याचे प्रयत्न करावेत. याचबरोबर रुग्णालयांचा दर्जा वाढविण्यासाठी नवीन योजना तयार कराव्यात. त्यासाठी राज्य सरकारकडून साहित्य आणि यंत्रसामग्री पुरवण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.

# कांदा लिलावाचे प्रसिद्ध केलेले बाजारभाव शेतकऱ्यांची दिशाभूल करणारे-औताडे

**माळवाडगाव (वार्ताहर)–** श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात काल गुरुवार दि.२४ एप्रिल रोजी मोकळा कांदा लिलावाचे प्रसिद्ध केलेले एक नंबर ११०० ते १२२५ रुपये बाजारभाव शेतकऱ्यांची दिशाभूल करणारे असून संगनमताने लिलाव करणाऱ्या व्यापाऱ्यांनी एकूण ४७ वाहनापैकी प्रत्येकी एक एक वाहन ११०० ते १२०० व १२२५ अशा फक्त तीन वाहनांना चार अंकी एक नंबरचा बाजार भाव दाखवून लिलाव दर प्रसिद्ध केलेले आहेत. उर्वरित सर्व वाहनांना तीन अंकी ६०० पासून ९००, पर्यंत सरसकट लिलाव काढलेले आहेत. अवघ्या दोन चार वाहनांचे लिलावात एक नंबरचे दर चढवून दाखविल्याने आर्थिक संकटात असलेले शेतकरी आकर्षीत होऊन मोठ्या अपेक्षेने येतात परंतू प्रत्यक्षात व्यापारी संगनमताने लुट करत असल्याचा आरोप शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल



औताडे यांनी केला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात औताडे यांनी म्हटले आहे की, काल गुरुवार दि.२४ एप्रिल रोजी श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात मोकळा कांदा लिलाव ठिकाणी पूर्व - पश्चिम वाहने लाईन असलेल्या जागेवर सकाळी ९ ५७ ला पूर्वेकडून लिलावास प्रारंभ झाला. ट्रॅक्टर वाहन (क्र.१) ७६५, २) ९७५, ३) ९२५ अशी सुरूवात झाली. एकुण ४७ वाहनापैकी सात ते आठ वाहनांमध्ये तीन नंबरचा माल होता.ऊर्वरित सर्व वाहनात एक नंबर, दोन नंबरचा उत्कृष्ट माल होता. ११.३० वाजता लिलाव संपल्यानंतर बाजार समितीने सोशल मीडियावर आजचे बाजारभावाची माहिती टाकली. मोकळा कांदा एकूण वाहने ४७ यात एक नंबर ११०० ते १२२५ रुपये दोन नंबर ९५० ते १०५०, तीन नंबर ८०० ते ९०० गोल्टीला १००० ते ११५० अशी सविस्तर माहिती, खाली सभापती महोदयांचे नांव. लिलाव संपल्यानंतर अर्धातास अंतराने व्हॉटस ॲपवर ही माहिती पाहून आम्ही अवाक् झालो. कारण आज सकाळी ९ पासून आमच्या कार्यकर्त्यांनी लिलाव प्रक्रिया पार पडेपर्यंत आखोदेखा हाल चित्रित केलेले आहेत. व्यापारी बाजार समिती कर्मचारी यांना समजू न देता. एक नंबर वाहनापासून तर ३७ नंबर वाहनापर्यंत प्रत्येक शेतकऱ्यांचे नाव, गाव लिलाव झालेली रक्कम व्यापारी टिममध्ये सामिल होऊन लिहून घेतली.

आमच्या यादीत एकूण ३७ वाहने आहेत संपूर्ण यादी प्रसिध्दीस न देता या एकूण ४७ वाहनापैकी अवघ्या आठ वाहनांना चार अंकी भाव देण्यात आलेला आहे. पहिल्या आठ वाहना व्यतिरिक्त सर्व वाहनापैकी नंबर एक मालास ८०० ते ९०० भाव मिळाले. दोन तीन नंबरला ६०० ते ७००भाव मिळाले आहेत. शेवटच्या वाहनातील माल खराब खाद सारखा होता.नो बीट केल्यानंतर शेतकऱ्यांचा चेहरा केविलवाणा झाला. अखेर एका व्यापाऱ्याने ते वाहन १०० रुपये क्विंटल म्हणजे एक रुपया दराने घेतले.नंतर बिचारा शेतकरी म्हणाला निदान गाडी भाडे तर जाईल.

व्यापारी लिलावात बोली बोलण्यास अथवा माल घेण्यास उदासिन असल्याचे आजच्या लिलावा दरम्यान दिसून आले.

सहा ते सात व्यापारी फक्त बरोबर राहायचे संपूर्ण खरेदी अवघ्या तीन चार व्यापाऱ्यांनीच केली.त्यात एकूण मालापैकी ४० टक्के माल एकाच व्यापाऱ्याने खरेदी केला. तीन रुपयांपासून लिलावास सुरूवात, अन एक एक रूपयांची बोली वाढ ही शेतकऱ्यांच्या मालाची चेष्टा नव्हे काय? लिलाव दरम्यान खाली सोडलेला शॉम्पल कांदा पुन्हा उचलून टाकण्यास महिला मजुरांना शेतकरी ५० ते १०० रुपये मोजतो पुन्हा ती महिला टोकरीत किलोभर कांदे घेते. शेतकरी चुपचाप पाहतो. अन् वरतून शेतकऱ्यांचे कैवारी समजली जाणारी बाजार समितीही चुपचाप व्यापाऱ्यांचे तालावर कांदा लिलाव सोडते हा शेतकऱ्यांचा तळतळाट असल्याचे शेवटी औताडे यांनी म्हटले आहे.

# प्रत्येक दहशतवाद्याला शोधून काढू- मोदी

**पाटणा–** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा जीव गेला. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर नरेंद्र मोदी यांची पाहिलीच जाहीर सभा आज झाली. राष्ट्रीय पंचायत दिनानिमित्त बिहारमध्ये मुधबनी येथे ही सभा होती. यावेळी त्यांनी पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहिली.

२२ तारखेला दहशतवाद्यांनी अत्यंत क्रूरपणे मारलं. त्यामुळे संपूर्ण देश व्यथित आहे. कोटी कोटी देशवासी दु:खी आहेत. सर्व पीडित परिवारांच्या दुखात संपूर्ण देश त्यांच्यासोबत आहे. ज्या कुटुंबातील अधिक इलाज चालू आहे. ते लवकर बरे व्हावेत यासाठी सरकार प्रयत्न करत आहेत, असं मोदी म्हणाले. तर देशाच्या दुश्मनांनी देशाच्या आत्म्यावर हल्ला केला आहे. मी स्पष्टपणे सांगतो, ज्यांनी हा हल्ला केला आहे, त्या दहशतवाद्यांना आणि हल्ल्याचं षडयंत्र रचणाऱ्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा दिली. त्यांना शिक्षा देणारच.आता दहशतवाद्यांना मातीत घालण्याची वेळ आली आहे.

# आजोबांचा अंत्यविधी करुन परतताना अपघात; लाडगावच्या तरुणाचा मृत्यू

**राहुरी (प्रतिनिधी)–** आजोबांचा अंत्यविधी करून मोटारसायकलवर घरी जात असलेल्या चैतन्य भांड या २० वर्षीय तरुणाचा अपघात होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना राहुरी तालुक्यातील लाख येथे काल दि. २४ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास घडली.



चैतन्य राजेंद्र भांड, वय २० वर्षे, रा. लाडगाव, ता. श्रीरामपूर या तरुणाच्या आईचे वडील म्हणजे आजोबा राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथे राहत होते. ते दि. २३ एप्रिल रोजी मयत झाले होते. चैतन्य भांड हा आजोबांच्या अंत्यविधीसाठी टाकळीमिया येथे आला होता. काल दि. २४ एप्रिल रोजी दुपारी चैतन्य भांड हा दुचाकीवरून टाकळीमिया येथून त्याच्या घरी लाडगाव येथे जात होता. दरम्यान राहुरी तालुक्यातील लाख परिसरात त्याच्या मोटारसायकलचा अपघात होऊन तो रस्त्याच्या कडेला असलेल्या साईड गटारात पडला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. रुग्णवाहिकेतून स्थानिक नागरिकांच्या मदतीने चैतन्य भांड याला राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

घटनेनंतर चैतन्य भांड याच्या नातेवाईकांनी राहुरी ग्रामीण रुग्णालयात गर्दी केली होती. या घटने बाबत सायंकाळी उशीरापर्यंत राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते. चैतन्य भांड याचा अपघात नेमका कसा झाला हे मात्र समजू शकले नाही.

# पाकिस्तानला हादरे

**नवी दिल्ली–** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशभरात संतापाची लाट आहे. या भ्याड दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता तर १७ जण जखमी झाले होते. भारत सरकारनं या घटनेनंतर महत्त्वाचे निर्णय घेतले. काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शासकीय निवासस्थानी सीसीएसची बैठक झाली या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. या निर्णयानंतर पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे.

पहलगाम येथे दहशतवादी हल्ला मंगळवारी दुपारी झाला होता. बैसरण भागात दहशतवाद्यांनी गोळीबार करुन भारतीयांवर हल्ला केला. नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पाच मोठे निर्णय घेण्यात आले. यामध्ये सिंध जल कराराला स्थगिती देण्यात आली. पाकिस्तानच्या नागरिकांना ४८ तासात देश सोडण्यास सांगण्यात आलं. अटारी बॉर्डर बंद करण्याचा निर्णय घेतला गेला. पाकच्या नागरिकांना दिलेले व्हिसा देखील रद्द करण्यात आले. भारतानं घेतलेल्या निर्णयानंतर पाकिस्तानला १० मोठे धक्के बसले आहेत.

**पाकला बसलेले १० धक्के**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाचा परिणाम पाकिस्तानच्या शेअर बाजारावर झाला. पाकिस्तानचं शेअर मार्केट क्रॅश झालं. पाकिस्तान स्टॉक एक्सचेंजवर केएसई-१०० निर्देशांक १०२४ अंकांनी घसरून ११७,२२६ अंकांवर आला.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं पाकिस्तानच्या जीडीपीचा विकास दराचा अंदाज घटवला आहे. तो ३ टक्क्यांवरुन २.६ टक्क्यांवर आणला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनंतर फिच रेटिंग्जनं देखील पाकिस्तानच्या चलनासंदर्भात इशारा दिला आहे. पाकिस्तानचा रुपया जूनपर्यंत एका डॉलरसाठी २८५ रुपयांपर्यंत घसरेल, असा अंदाज व्यक्त केला.

सिंधू जल करार स्थगित करण्यात आल्यानं पाकिस्तानच्या शेती उत्पादनावर आणि पिण्याच्या पाण्यावर परिणाम होईल. काही राज्यांमध्ये वीज संकट निर्माण होऊ शकतं.

अटारी चेकपोस्ट बंद करण्याचा निर्णय घेतल्यानं पाकिस्तानचं जवळपास ३ हजार कोटींचं नुकसान होऊ शकतं. पाकिस्तानकडून सोयाबीन, भाज्या, लाल मिर्चीसह इतर गोष्टींची भारतात निर्यात व्हायची ती बंद होणार आहे.

जागतिक बँकेंन पाकिस्तानला इशारा देत चालू आर्थिक वर्षात १ कोटी पाकिस्तानी नागरिकांच्या खाद्य सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल, असा अंदाज वर्तवला. देशात गरिबी वाढेल, असा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे.

भारतानं पाकिस्तानी नागरिकांना दिलेला सार्क व्हिसा तातडीनं रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळं यापुढे पाकिस्तानी नागरिकांना भारतात येता येणार नाही.

जे पाकिस्तानी लोक भारतात असतील त्यांना ४८ तासांमध्ये देश सोडून जावं लागणार आहे. त्यामुळं जोपर्यंत तणाव कमी होत नाही तोपर्यंत ते पुन्हा भारतातयेऊ शकणार नाहीत.

# विष्णू रहाणे यांचे निधन

**संगमनेर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील गुंजाळवाडी येथील



शेतकरी विष्णू गोविंद राहणे (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. भाऊसाहेब रहाणे यांचे ते वडील होत.

# नामदेव रहाणे यांचे निधन

**संगमनेर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील गुंजाळवाडी



रहाणे मळा येथील शेतकरी नामदेव गोविंद रहाणे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, नात असा परिवार आहे. ॲड. राजेंद्र रहाणे यांचे ते वडील होत.

# मयताच्या वारसांना चार वर्षांनी मिळाला न्याय

## विमा कंपनीस नुकसान भरपाई देण्याचा जिल्हा ग्राहक आयोगाचा आदेश

**राहाता (प्रतिनिधी)–** शिर्डी येथील हॉटेल व्यावसायिक मयत सुभाष राजेंद्र कराडे यांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळण्याकरिता जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग अहिल्यानगर न्यायालयात ४ फेब्रुवारी २०२१ रोजी अर्ज दाखल केला होता. त्याचा निकाल नुकताच न्यायालयाने देऊन मयताच्या वारसांना कर्ज सुरक्षा रक्कम ६५ लाख रुपये देण्याचे आदेश केले आहेत. तसेच कर्जदार सुभाष राजेंद्र कराडे यांच्या मयत दिनांकापासून ६ टक्के व्याजाने रक्कम देण्याचे आदेश फ्युचर जनराली इंडिया लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे डिविजनल मॅनेजर यांना आयोगाचे अध्यक्ष प्रज्ञा देवेंद्र हेंद्रे व सदस्य संध्या श्रीपती कसबे यांनी केला आहे.

हा तक्रार अर्ज राहाता येथील ॲड. चंद्रकांत जपे यांचेमार्फत मयताच्या वारसांनी दाखल केला होता. मयत सुभाष सुभाष राजेंद्र कराडे याने ए यु स्माल फायनान्स बँक लिमिटेड संगमनेर शाखा या बँकेतून कर्ज रक्कम ७५ लाख रुपये ३१ जुलै २०१८ रोजी घेतले होते. सदर कर्जाकरिता इन्शुरन्स कंपनीने लोन सुरक्षा पॉलिसी मयताला दिली होती. २०२० साली कोविड आजाराने नाशिक येथे उपचारादरम्यान कर्जदार मयत झाला होता. त्याचे कायदेशीर वारसांनी विमा सुरक्षेची रक्कम मिळणेकरीता कंपनीकडे क्लेम फॉर्म भरून दिला. मात्र कंपनीने मयताच्या वारसांचा विमा सुरक्षा नाकारल्याने मयताच्या वारसांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग अहिल्यानगर न्यायालयात ॲड. चंद्रकांत जपे यांचे मार्फत ग्राहक तक्रार अर्ज दाखल केला. सदर प्रकरणामध्ये अध्यक्ष व सदस्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेसमोर कायदेशीर बाबींचा उहापोह होऊन तसेच वरिष्ठ न्यायालयाचे न्यायनिवाडे या सर्वांचे विवेचन करून आयोगाने इन्शुरन्स कंपनीस व्याजासहित रक्कम देण्याचे आदेश केले आहे. ॲड. चंद्रकांत जपे यांना ॲड. सत्यजित कडू, ॲड. किरण जपे-औताडे यांनी सहकार्य केले.

# तरुण शेतकऱ्याचा शेततळ्यात पडून मृत्यू

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील वडगाव लांडगा येथील तरुण शेतकऱ्याचा गुरुवारी (दि.२४) पहाटे पाच वाजता शेततळ्या बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी संगमनेर तालुका पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की सोपान बाळासाहेब लांडगे (वय २९) हा तरुण शेतकरी पहाटे शेततळ्यावर पाहणी करण्यासाठी गेला असता पाण्यात पडून मृत्यू झाल्याची घटना घडली. त्यास तत्काळ घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारांपूर्वीच मयत असल्याचे घोषित केले. याबाबत ज्ञानेश्वर बाळासाहेब लांडगे यांनी दिलेल्या खबरीवरुन तालुका पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या दुर्दैवी घटनेने परिसरावर शोककळा पसरली आहे.

## पान १ वरुन

### दहशतवादी तळं उद्ध्वस्त करा

द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि त्यांना पहलगाम हल्ल्याची माहिती दिली.

भारत सरकारने अटारी सीमा बंद करण्याची घोषणा केल्यानंतर, व्हिसावर भारतात आलेले पाकिस्तानी नागरिक पंजाबमधील अटारी चेकपोस्टवरून परतू लागले.केंद्र सरकारने पाकिस्तान सरकारच्या एक्स हँडलवर भारतात बंदी घातली आहे.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने आपल्या नागरिकांना जम्मू आणि काश्मीरला न जाण्याचा सल्ला देणारा एक सल्लागार जारी केला आहे. पहलगाम हल्ल्याचा निषेध करण्यासाठी श्रीनगरमधील दुकानदारांनी काळे झेंडे हातात घेतले.

### माझ्या समोर गोळ्या घातल्या

आम्ही तिथं असलेल्या सगळ्या महिलांनी मोठ्या-मोठ्या अजाण म्हटलं, पण त्यांनी आमच्या माणसांना मारून टाकलं.

तिथे गेटवर एक मुस्लिम होता, तो म्हणत होता तुम्ही कशाला निरपराध लोकांना मारता त्यांनी काय चुकी केली आहे? त्याला सुद्धा पुढे करून गोळ्या घातल्या. आम्ही तिथं घोड्यावर बसून गेलो, तरी आम्हाला भीती वाटत होती. आम्ही पळत सुटलो तिथून तर चिखलात गुडघ्याइतके पाय खाली रुतत होते.

आणि...आम्ही सगळे अल्लाह हू अकबर म्हणायला लागलो

आमचे घोड्यावाले मुस्लिम होते, पण ते खूप चांगले होते. ते आम्हाला हल्ला झाल्यानंतर घ्यायला आले. त्यांचा मित्र बाजूला होता, त्याला बोलावून घेतलं आणि म्हणाला अजान पढता है क्या, पढता है क्या कुछ? त्यांचं बोलणं ऐकून आम्ही आमच्या टिकल्या काढून फेकल्या. आम्ही सगळे अल्लाह हू अकबर म्हणायला लागलो असे कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नीने सांगितले.

### मोदींच्या इशाऱ्यानंतर नौदलाचं मोठं पाऊल, क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

समुद्र सपाटीलगत उडणाऱ्या क्षेपणास्त्राची वेद घेण्यात हे मिसाईल महत्वाचे ठरणार आहे. आयएनएस सुरतने हे चाचणी यशस्वीरित्या पार पाडली. हा भारताची संरक्षण क्षमता मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे शत्रुंवर हल्ला करण्यासोबतच शत्रुंकडून होणारा हल्ला रोखण्यात देखील भारतीय नौदल सक्षम होणार आहे.

### दोन्ही पवारांना एकत्र आणण्यासाठी सुप्रियाताई मध्यस्थी करू शकतात!

पुन्हा एकत्र येणार, अशी चर्चा राजकारणात रंगत आहे. याचप्रमाणे पवार कुटुंब एकत्र येणार का? असा प्रश्न पवार यांना करण्यात आला. यावर प्रतिक्रिया देत आ. पवार यांनी एक सूचक विधान केले.

यावेळी बोलताना आ. पवार म्हणाले की, राजकीय दृष्टिकोनातून मी काही बोलणार नाही. मात्र, परिवाराच्या कुटुंबाच्या दृष्टिकोनातून विचार केला असता आपली भारतीय संस्कृती आपल्याला एकत्र राहण्याचे शिकवते. भारतीय संस्कृती असो किंवा पवार कुटुंबाविषयी बोलायचे झाले, तर पवार कुटुंब एकच आहे. मात्र जो, काही थोडेफार मतभेद असतील तर मिटावे, अशी इच्छा आ. पवार पवार यांनी व्यक्त केली. तसेच पुढे ते म्हणाले, पवार कुटुंबांनी अधिक ताकदीने एकत्र आले पाहिजे, अशी आमची व्यक्तिगत इच्छा आहे. मात्र, राजकीय दृष्टिकोनातून आपण विचार केला तर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा असलेले शरद पवार आणि आज दुसऱ्या पक्षाचे नेते असलेले अजित पवार यांनी एकत्र येत निर्णय घेण्याची गरज आहे. जर या गोष्टी कोणी मध्यस्थी करू शकत असेल, तर ते म्हणजे खासदार सुप्रियाताई सुळे या आहेत. म्हणूनच या तिघांमध्ये भविष्यात एकत्र येण्याबाबत काय निर्णय होईल, यावर आज तर भाष्य करता येणार नाही. मात्र येणाऱ्या काळात ते तिघेच एकत्र येणाबाबतची भूमिका स्पष्ट करू शकतात, असे यावेळी बोलताना आमदार पवार म्हणाले. आ. पवार यांच्या सुचक वक्तव्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी एकत्र येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### खासगी अंगणवाड्या, बालवाड्यांची नोंदणी अनिवार्य

संबोधण्यात आले आहे. सध्या ३ ते ६ वर्ष वयोगातील बालकांना अंगणवाड्या, बालवाड्या तसेच शाळेला जोडून असलेल्या पूर्व प्राथमिक वर्ग आणि खासगी पूर्व प्राथमिक वर्गातून शिक्षण दिले जाते.

शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अंगणवाड्या, बालवाड्या यांची नोंदणी महिला आणि बालविकास विभागाकडे आहे.मात्र, खासगी पूर्व प्राथमिक वर्गांची माहिती राज्य सरकारकडे उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना शिक्षण देणाऱ्या पूर्व प्राथमिक शिक्षण केंद्राची नोंदणी बंधनकारक करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या केंद्रांची नोंद झाल्यास त्याची एकत्रित माहिती राज्य, जिल्हा स्तरावर पालकांना उपलब्ध होणार आहे. सरकारने नोंदणीची सुविधा शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावरील वेब लिंकमध्ये असलेल्या पोर्टलवर उपलब्ध करून दिली आहे. याबाबत प्राथमिक विभागाच्या शिक्षण संचालकांना कार्यपूर्ती अहवाल सादर करण्याची सूचना देण्यात आली आहे.

### बिल्डरची गरज नाही.. बँकेचं कर्ज घेऊन गृहनिर्माण सोसायटी...

याच कार्यक्रमात संबोधित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दरेकरांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणा केली होती. काल या समितीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

### विद्यार्थ्यांवर रॅगिंग, तिघांवर कारवाई

या वसतिगृहात ९ वी च्या विद्यार्थ्यांकडून ८ वीच्या विद्यार्थीना बेदम मारहाण करण्यात आली असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर संबंधित घटनेची दखल घेत जिल्हास्तरावर चौकशी समिती स्थापन करण्यात आली. या समिती मार्फत चौकशी करण्यासाठी पथक वसतीगृहात गुरूवारी दखल झाले. समाज कल्याण विभागाचे सहायक उपायुक्त कोंरगटिवार यांनी जामखेडच्या वसतीगृहाला भेट दिली. या प्रकरणी जिल्हास्तरीय चार अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आली आहे. या प्रकरणात रॅगिंग करत मारहाण करणाऱ्या तीन विद्यार्थींना शाळेतून काढुन टाकण्यात आले आहे. तसेच आशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती नेमण्यात आली आहे. या संदर्भातील अहवाल वरिष्ठांना पाठवण्यात येणार असल्याचे कोरगंटीवार यांनी सांगितले. या प्रकरणी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष अतिश पारवे निवेदन देत जबाबदार कर्मचारी अशा प्रकारणाकडे गांभिर्याने पाहत नाहीत. त्यामुळे त्यांची चौकशी होवून ते निलंबित व्हावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### वांबोरीत तरुणाची रेल्वेखाली उडी घेऊन आत्महत्या

वांबोरी येथील पोलीस चौकीसमोर ठेवण्यात आला होता.

राधेशाम दत्तात्रय कुसमुडे रा. वांबोरी, ता. राहुरी यांनी लोहमार्ग पोलिसाकडे दाखल केलेल्या फिर्यादीत म्हटले, निखील देवकर याच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच त्याचा व्हिडीओ व्हायरल करून बदनामी करण्यात आली. या कारणातून मानसिक तणावामुळे निखील याने आत्महत्या केली. सुमित किरण ऊर्फ बाळासाहेब मुनोत व किरण मुनोत यांनी बदनामी केल्यामुळे निखील हा आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला.

राधेशाम दत्तात्रय कुसमुडे रा. वांबोरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किरण शांतीलाल मुनोत रा. वांबोरी, सुमित किरण मुनोत रा. वांबोरी यांच्या विरोधात अहमदनगर लोहमार्ग पोलीस ठाण्यात गु.र.न. ६४ प्रमाणे भारतीय न्याय संहिता १०८, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.